


दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

VADAL VARTA

प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा,तालुका,गाव पातळीवर वार्ताहार/पत्रकार/जाहिरातदार प्रतिनिधी नेमणे आहे.

दैनिक वादळ वार्ता

या लोकप्रिय दैनिक वृत्तपत्राकरिता महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात प्रतिनिधी नेमणे आहेत. इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.

** पात्रता **

१. समाजसेवेची आवड २. जनसंपर्क ३. स्मार्ट फोन असणे आवश्यक ४. सोशल मीडियाचा वापर करता येणे

संपर्क-९४२२६६००७७

जॉईन झालेल्या प्रत्येक प्रतिनिधींना आय कार्ड आणि नियुक्ती पत्र दिले जाईल.

vadalvartanews@gmail.com


●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले ●कार्यकारी संपादक : संतोष निकम मो.न. ९४२२६६००७७

● बीड/महाराष्ट्र ● शुक्रवार ५ एप्रिल २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक २३२ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

# बोल बजरंग बली की जय

## उमेदवारी जाहिर होताच कार्यकर्त्यांचा जल्लोष

शेतकरी पुत्र बजरंग सोनवणे यांची उमेदवारी जाहिर होताच जिल्हयातील तथा केज तालुक्यातील कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष केला त्यामध्ये बजरंग सोनवणे यांच्या केज येथील पवनसुत निवासस्थानी तसेच छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये कार्यकर्त्यांनी फटाके वाजवत "बजरंग बप्पा तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है ! घोषणां देत परिसर दणाणून सोडला.



वादळवार्ता/बीड

बीड जिल्ह्याला ज्याची तीव्रतेने प्रतिक्षा होती ती प्रतिक्षा आज संपली आहे . राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या वतीने यास पूर्णविराम देत शेतकरीपुत्र बजरंग सोनवणे यांची बीड लोकसभेचे उमेदवार म्हणून उमेदवारी जाहीर केली आहे . एकीकडे भाजपाच्या माजी ग्रामविकास मंत्री पंकजा मुंडे यांची उमेदवारी भाजपा कडुन जाहीर झालेली असताना. दुसरीकडे मात्र महाविकास आघाडीचा उमेदवार कोण याकडे सर्व बीड जिल्ह्याचे लक्ष लागले होते. त्यामध्ये ज्योतीताई मेटे की बजरंग सोनवणे ? या चर्चेला बीड जिल्ह्यामध्ये उधाण आले होते .आज त्यावर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या वतीने एक प्रसिद्धी पत्रक काढून त्यामध्ये भिंवडी लोकसभा मतदार संघातून सुरेश उर्फ बाळ्यामामा म्हात्रे तर बीड लोकसभा मतदारसंघातून शेतकरी पुत्र बजरंग सोनवणे यांची उमेदवारी जाहीर केली असल्यामुळे बीड जिल्हयातील उमेदवार कोण ? या चालल्लेल्या चर्चेला पूर्णविराम दिला आहे .

## राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्षाकडून दोन नावांची यादी जाहीर

राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने दि .३० मार्च रोजी प्रसिद्धी पत्रकात ५ नांवाची यादी जाहिर करण्यात आली होती त्यानंतर दि ४ एप्रिल रोजी प्रसिद्धी पत्रकात दोन उमेदवारांची नावे जाहीर करण्यात आली त्यामध्ये भिंवडी लोकसभा मतदार संघातून सुरेश उर्फ बाळ्यामामा म्हात्रे तर बीड लोकसभा मतदारसंघातून बजरंग सोनवणे यांच्या नावांची यादी जाहीर केली आहे.

**सलग दुसऱ्यांदा राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस व मित्रपक्षाच्या महाविकास आघाडीचा अधिकृत उमेदवार म्हणून माझ्या नावाची घोषणा झाली. एका सामान्य शेतकरीपुत्रावर पुन्हा एकदा विश्वास टाकल्याबद्दल मी देशाचे नेते खा. शरदचंद्र पवार यांचे हृदयपूर्वक आभार व्यक्त करतो अशी उमेदवारी जाहीर होताच पहिली प्रतिक्रिया बजरंग सोनवणे यांनी दिली.**

## उमेदवारी जाहीर होताच शेतकरीपुत्र बजरंग सोनवणेचां जिल्हा दौरा

धानोरा, ता. आष्टी स. ०९.००,कडा, ता. आष्टी स. ९.३० धामणगाव, आष्टी. स. १०.०० अमळनेर, ता. पाटोदा- स. १०.३० ,पिंपळवंडी, ता. पाटोदा स. ११.००डोंगरकिन्ही, ता. पाटोदा स. ११.३०, श्री क्षेत्र नारायणगड, ता. बीड १२.१५,साक्षाळपिंपरी, ता. बीड दु. १.०० वा,मादळमोही, ता. गेवराई दु.१.३० पाडळसिंगी, ता. गेवराई दु. १.४५, गेवराई दु. २ वाजता ( राष्ट्रवादी कॅाग्रेस- शरदचंद्र पवार पक्षाच्या गेवराई विधानसभा मतदारसंघाच्या नियोजित बैठकीस उपस्थिती) तालखेड फाटा ३.०० ,माजलगाव दु. ४.००,तेलगाव, ता. धारूर ५.००,धारुर ५.३०,केज ६ वाजता.



## संपादकीय

# जब हम जवाँ होंगे........ मतदार होंगे !

लहानपणी बघितलेली स्वप्नं पूर्ण करणं तारुण्यात आणि सज्ञान झाल्यावर आवश्यक असतं यात मतदार म्हणून हक्काचा स्वप्न पूर्ण झालेल्या प्रत्येकाने आपला हक्क देखील बजावला पाहिजे मतदान केलं पाहिजे.

एक गाणं खूप लोकप्रिय झालेलं त्यात मोठ्या स्वप्न रंजनाची गोष्ट होती जब हम जवाँ होंगे जाने कहा होंगे या स्वप्नरंजनात लहानपणी अनेक जण असतात आणि त्या वयात मोठा झाल्यावर काय करायचं याचं मनोनियोजन होत असत.

आपण आपली सामाजिक आणि आर्थिक स्थिती जाणून असतो आणि त्यावेळी असणाऱ्या आपल्याच वयाच्या मुलाप्रमाणे बाल सुलभ स्वप्न बघत असतो. बालमनाला नव्याची ओढ आणि कुतुहल मोठ्या प्रमाणावर असतं जे आपल्याला आज करू देत नाही ते करण्याची नैसर्गिक वृती आणि उर्मी मनात दौडत असते. मोठं झाल्यावर काय? पालक आपल्या परीने घरात डॉक्टर घडवायचा की इंजिनिअर असे आडाखे बांधत असतात पण बालमनाला वेगळीच ओढ असते... एक मात्र खरं प्रत्येकाला मोठं व्हायचं आणि मोठेपणी काहीतरी करायचं नक्की असतं काही धुसर चित्र मनात असतात आणि ती पूर्ण करण्याचे प्रयत्न देखील याच वयात सुरु होतात.

मोठं झाल्यावर वाहन चालवण्याचा परवाना मिळवायचा हे अमेरिकन मुलांचं कायम स्वप्न असतं कारण वेगाचं वेड प्रत्येक ठाई असतं आणि त्यासाठी त्याची धडपड देखील असते आपल्याकडे देखील मुलांना असंच वाटतं पण आजची पिढी बघता असं म्हणता येईल की साऱ्यांना क्रिकेट आणि सोशल मिडियाने भारून ठेवले आणि जागोजागी याचा आपणास प्रत्यय येतो.

आयपीएलची मॅच म्हणजे पर्वणी सारं काही विसरून प्रत्येकाला क्रिकेट बघण्याची ओढ आणि क्रिकेटर होण्याचं वेड आहे. उरला वेळ मग इन्स्टा, फेसबुक यावर दिसणाऱ्या विश्वात रंगत नवीन स्वप्न बघायला वेळ राहत नाही. घरच्यांनी धोषा लावला म्हणून अगदी अपरिहार्यपणे अभ्यासाकडे वळणारे बहुसंख्य आहेत.

आपल्या देशाच्या या लोकशाही रचनेत आपण स्वतःला आर्थिक आणि सामाजिक भान मिळायला पाहिजे हे त्या वयात जाणवत नाही... बालकांचं आणि तरुणांचं ठिक आहे परंतु पालकांचं काय असा सवालही यानिमित्ताने उभा राहतो.

आजची पिढीही उद्याचं भविष्य आहे आणि ते भविष्य आम्हाला घडवायचं आहे

# पत्रकारीतेसी प्रामाणीक असलेले संपादक: मा.बालासाहेब फड

कुठल्याही गोष्टीचा प्रारंभ उत्साहाने करने शक्य होते परंतु प्रारंभ केलेली गोष्ट तितक्याच निष्ठेने आणि प्रामाणिकपणे पुढे चालवणे हे महाकठीण काम आहे. त्यातले त्यात पत्रकारिता करणे हे तर सतीचे वाण आहे. अलीकडच्या काळात इलेक्ट्रॉनिक मीडिया मोठ्या प्रमाणावर आला असल्यामुळे पत्रकारितेकडे म्हणावे तेवढे वाचक आकर्षित होताना दिसत नाहीत.अस्या अवस्थेमध्ये ही काही संपादक आपल्या कार्य कुशलतेमुळे आपल्या वृत्तपत्राच्या माध्यमातून वाचकांना आपल्याशी जोडून ठेवतात. आपली मायभूमी, त्यातील विविध समस्या यांना वाचा फोडण्याचा प्रामाणिक प्रयत्न करतात.पत्रकारितेसी प्रामाणिक राहून सतत कार्यशील राहतात. समाजातील उपेक्षित पण कार्यासी प्रामाणिक असणाऱ्या माणसांना मग ते कुठल्याही क्षेत्रातले असोत आपल्या पत्रकारितेच्या माध्यमातून उजेडात आणण्याचे काम करतात. अशाच पत्रकारांच्या पैकी एक पत्रकार म्हणजे संपादक मा. बालासाहेब फड होत. आज दि.०४ एप्रिल २०२४ हा त्यांचा जन्मदिवस. त्यानिमित्ताने त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा घेतलेला हा आढावा.

भारत हा विविधतेने नटलेला देश आहे.या देशाला फार प्राचीन परंपरा लाभलेली आहे. हा देश एकेकाळी सोने की चिडिया म्हणून ओळखला जात होता. येथे नालंदा,तक्षशिला सारखे विद्यापीठे होती. "राजा स्वदेश पूजन्ते 1 विद्वान सर्वत्र पुजन्ते" असा विचार प्रामुख्याने मांडला जात होता.नंतर या देशावर परकीयांनी आक्रमणे केली व या देशाला लुटले. त्यातच राजेशाहीचा जन्म झाला. छत्रपती शिवरायां सारखे मोजके राजे सोडले तर अनेक राजांनी जनतेची पिळवणूक केली.नंतर देशावर दीडशे वर्षे इंग्रजांनी राज्य केले.त्यांनी भारतीय जनतेचा अनन्वित छळ केला.अशातही काही सुधारणा ही आणल्या. तदनंतरच्या कार्यकाळात १५ ऑगस्ट १९४७ ला देशाला स्वातंत्र्य मिळाले पण लोकांची खरी प्रगती करावयाची असेल तर लोकशाही शिवाय पर्याय नाही हे लक्षात घेऊन येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर व अन्य विद्वानांनी संसदीय लोकशाहीचा स्वीकार आपल्या राज्यघटनेत केला. ही लोकशाही मुळात चार खांबावरती आधारलेली आहे. जीचा पहिला खांब कायदेमंडळ, दुसरा खांब कार्यकारी मंडळ, तिसरा खांब न्याय मंडळ व चौथा खांब प्रसारमाध्यमे आहेत. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यात या चौथ्या खांबाचा म्हणजे प्रसारमाध्यमांचा विशेषतः वृत्तपत्रांचा महत्त्वाचा वाटा राहिला आहे.आजही लोकशाहीला खंबीर बनविण्याचे काम हे प्रसारमाध्यमे त्यातही वृत्तपत्रे करताना दिसतात. असेच लोकशाहीला खंबीर करण्याचे काम दै.सोमेश्वर साथी या दैनिकाचे संपादक बालासाहेब फड हे सातत्याने करताहेत.हे ही नसे थोडके.

बालासाहेब फड यांचा जन्म 04 एप्रील 1974 रोजी माता गंगाबाई व पिता सिताराम यांच्या पोटी बारा ज्योतिर्लिंगापैकी एक असलेल्या वैद्यनाथाच्या शेजारी असलेल्या कन्हेरवाडी ता.परळी येथे झाला.त्यांना



बालपणापासुन प्रभू वैद्यनाथ व संत जगमित्र नागा यांचा आशीर्वाद लाभला.घरात सात पिढ्यांपासून वारकरी संप्रदायाचे वातावरण असल्यामुळे कीर्तन,नामस्मरण व श्रवणभक्ती घडली व या अनुषंगाने चौफेर ज्ञान प्राप्त करता आले.ते स्वतः वारकरी संप्रदायाचे अनुयायी आहेत.सांप्रदायावर त्यांचा जीव आहे.त्यांनी आपल्या ह.भ.प. बालकिर्तनकार प्रकाश महाराज फड नावाच्या मुलाला वयाच्या सातव्या वर्षी ज्ञानाई गुरुकुल सेलू येथे वारकरी संप्रदायाचे शिक्षण घेण्यासाठी ठेवले. त्यांचे चिरंजीव या वयात अभ्यासू व उत्तम कीर्तन करतात. तसेच त्यांचे दुसरे चिरंजीव ह.भ.प बाल कीर्तनकार संग्राम महाराज फड हे ही कीर्तनकार म्हणून प्रसिद्ध आहेत. या पुर्वी म्हटल्या प्रमाणे वृत्तपत्र व्यवसाय हा सतीचे वाण आहे .कारण या व्यवसायात बातमी लावताना हजारदा विचार करावा लागतो. बातमीची सत्यता असावी, स्पष्टता असावी,सदरक्षणाय खलनिग्रहणाय हे साध्य व्हावे. पद,पैसा,तोंड पाहून न लिहिता जे सत्य आहे ते लिहावे लागते. ही सगळी वैशिष्ट्ये संपादकाला पाळावी लागतात.एखादी चुकीची बातमी लागली तर त्याची खूप मोठी किंमत संपादकाला सोसावी लागते हे एक प्रकारचे अग्निदिव्यच आहे. पण हे अग्निदिव्य संपादक बालासाहेब फड हे 1995 पासून सांभाळत आहेत.त्यांनी साप्ताहिक परळी संदेश या पासून ते हे काम करत आहेत.ना कुठला या क्षेत्रातला वारसा ना भरगच्च पाठीमागे संपत्ती पण प्रामाणिकतेच्या जोरावर हे कार्य ते पार पाडताना दिसतात.संत तुकाराम महाराजांनी म्हटल्याप्रमाणे असाध्य ते साध्य करिता सायास 1

या न्यायाप्रमाणे त्यांनी ही असाध्य काम साध्य केले आहे. या साप्ताहिकाचे काम करत करत २०१६ पासून सोमेश्वर साथी या दैनिकाचा प्रारंभ केला आहे.या दैनिकाच्या माध्यमातून त्यांनी अनेक नवोदितांना लेखन मंच उपलब्ध करून दिला आहे. आमचे अनेक लेख त्यांनी छापून आम्हाला लिहिते करण्याचे काम ते करतात.एवढेच नाही तर समाजात चांगुलपणा पेरण्याचं काम करणाऱ्या गुणवंतांचा या वृत्तपत्राच्या मार्फत पुरस्कार देऊन सन्मानही करतात.चांगल्या कार्याला प्रबलन देण्याचं काम ते सतत करत आले आहेत.यासाठी स्वतःचे मन मोठे असावे लागते. जगाला ज्यांच्या कार्य कर्तुत्वाचा अभिमान वाटतो त्या शिवरायांच्या जन्मोत्सवाच्या निमित्ताने हा कार्यक्रम घडवून आणतात. त्याशिवाय अशा गोष्टी करता येत नाहीत.हेच यातून दिसून येते.

भले तरी देऊ कासेची लंगोटी 1
नाठाळाचे माथी हाणू काठी 1

ही भूमिका त्यांची दिसते.वारकरी संप्रदायाची प्रत्येक घडामोड आवर्जून आपल्या वृत्तपत्रात घेतात.

त्यांच्या अंतकरणात आपणास मदत करणा-यांबद्दल सतत कृतज्ञता दिसते.

आय.ए.एस.मा.किरण गित्ते साहेब व विवेकानंद यूथ वेलफेअर सोसायटीच्या अध्यक्षा मा.सौ. उषाताई किरण गित्ते त्यांच्याप्रती ते नेहमी आभार व्यक्त करतात. वारकरी संप्रदायातील अनेक गायक,वादक,कीर्तनकार हे त्यांचे अत्यंत जवळचे मित्र आहेत. त्यांना आई-वडिलांचे आई गंगाबाई वडील सितारामजी यांचे सुरुवातीपासून सहकार्य लाभले. दोन भाऊ तसे दोन मुलांचे ही सहकार्य लाभत आले आहे. संपादक म्हटले की समाजसेवेसाठी खूप वेळ द्यावा लागतो अशा वेळेस घर सांभाळणारी व समजून घेणारी पत्नी महत्त्वाचे असते 2002 साली लग्न झाले तेव्हापासून मुलांची व परिवाराची सर्वाधिक काळजी त्यांच्या सौभाग्यवती ज्ञानेश्वरी बालासाहेब फड या घेत आहेत. त्यांच्या बद्दलही ते भरभरून सांगतात. वारकरी संप्रदायातील अनेक महाराज मंडळी वरती लेख ते नेहमीच आपल्या वृत्तपत्रात छापतात. महापुरुषांच्या व कार्यकर्तृत्व गाजवणाऱ्या राजकीय नेत्यांच्या वरती ही ते नेहमीच आपल्या वृत्तपत्रातून भरभरून लिहताना दिसतात.

अस्या सव्यासाची व पत्रकारीतेसी प्रामाणीक असणा-या संपादक मा.बालासाहेब फड यांचा आज वाढदिवस. त्यानिमित्त त्यांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा देतो व त्यांच्याकडून भविष्यातही असेच वृत्तपत्रीय व अन्य कार्य घडेल अशी अपेक्षा व्यक्त करून मी माझे लेखन थांबवतो.

**प्रा.डॉ.रामकृष्ण बदने**
**ग्रामीण महाविद्यालय,वसंतनगर**
**ता.मुखेड जि.नांदेड**
**भ्रमणध्वनी -9423437215**

# सरपंच संतोष जोगदंड आक्शन मोड मध्ये वाणगावच्या विकास कामाला गती




वादळवार्ता/बीड

बीड (प्रतिनिधी):- बीड तालुक्यातील वाणगाव येथील निवडणुकीत नवीन युवा युवकांनी क्रांती घडवून आणली अन् प्रस्थापितांना धक्का देत बदल केला.व एक नवयुवक तरुण सरपंच पदी विराजमान झाले. युवा पर्वाचे संतोष जोगदंड सरपंच झाल्यापासुनच गाव विकासाला प्राधान्य देत आक्शन मोडमध्ये आहेत.सतोष जोगदंड हे एका सामान्य शेतकरी कुटुंबातील तरुण आहेत. दुरदुर कसलाही राजकीय संबंध नसतानाही केवळ युवकांच्या शक्तीमुळे सरपंच पदी विराजमान झाले. तर गावातील शेतमजुर असलेला अशोक जोगदंड हे उपसरपंचपदी विराजमान झाले. विकासाला व नागरिकांच्या समस्या साठी सरपंच संतोष जोगदंड यांनी गाव वाड्या वस्त्यावर पाणी पुरवठा विजपुरवठा आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देण्यात अग्रक्रम दिला. तर काही मोक्याच्या ठिकाणी सिमेंट रोड सोय केली आहे. गावात आणेक सुविधा बसवण्यात सरपंच संतोष जोगदंड यांनी पुढाकार घेतला. तर वाड्या वस्त्यावर काही रस्त्यावर मुरुमही टाकुन रहदारीची समस्या सोडवली. सरपंच संतोष जोगदंड यांनी कोणत्याही विकास कामासाठी ठरावाला किंवा नाहरकतीला आडकाठी आणली नाही. सरपंच संतोष जोगदंड यांनी विकासाला चालना कशी द्यावी व त्यासाठी ग्रामस्थांना एकत्र करुन मार्गदर्शन कार्यशाळा घेण्यात येणार आहेत. प्रत्येक वाडी वस्तीवर संपर्क साधुन समाजहितासाठी जे करता येईल ते करण्याचा सरपंच संतोष जोगदंड यांचा संकल्प असुन ग्रामपंचायत चे सर्व सन्माननीय सदस्य, युवा पर्व वाणगाव येथिल युवा, पुणे मुंबई व इतरत्र कामधंदा करण्यासाठी असलेले युवा कार्यकर्ते यांच्या आदेशानुसार वेगवेगळया प्रकारच्या निधीतून विकास योजनेअंतर्गत लाभार्थीना लाभ दिला जात आहे. वाणगाव परिसरातील पाणंद रस्ते, वयक्तीक लाभार्थ्यांना लाभ या योजना कार्यान्वित झाल्या असुन. शैक्षणिक व आरोग्य विषयक कामावर सरपंच संतोष जोगदंड यांनी लक्ष घातले आहे. दवाखान्यात कोणताही रुग्न उपचाराविना राहु नये तसेच पशुसंवर्धन दवाखान्यात पशु चिकित्सा केली जाते किंवा नाही याकडे ही सरपंच गांभीर्याने लक्ष देत आहेत, ग्रामविकास अधिकारी विजेय शिंदे यांच्या प्रशासनिक अनुभवानुसार वाणगाव येथिल प्लेवर ब्लॉक, तसेच गाव अंतर्गत येणारे रस्ता व प्लेवर ब्लॉक बसवण्यात आल्याने नागरीकांत समाधान व्यक्त होत आहे. वानगाव मतदारांनी युवा वर्गाला ला मोलाचं योगदान दिले आहे त्यांना वास्तव चित्र निर्माण होईल असेच काम वाणगाव येथे होईल असा आशावाद सरपंच संतोष जोगदंड यांनी बोलुन दाखवला आहे.

# शरद पवार माझ्या बारशाला आले होते, पण मी आता बच्चा राहिलेलो नाही कॉलर उडवत उदयनराजे काय म्हणाले ?

खासदार उदयनराजे भोसले यांनी आज पुन्हा कॉलर उडवली. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी उदयनराजे यांच्यासारखी कॉलर उडवत त्यांना चॅलेंज दिल्याची चर्चा होती. त्यानंतर आज उदयनराजे यांनी पुन्हा कॉलर उडवली. विशेष म्हणजे त्यांनी शरद पवारांवर टीका करणं टाळलं. "शरद पवार वडीलधारी आहेत. ते माझ्या बारशाला आले होते. मी त्यांच्यावर टीका करणं योग्य नाही. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते शशिकांत शिंदे, श्रीनिवास पाटील, काँग्रेस नेते पृथ्वीराज चव्हाण सर्वांशी माझे चांगले संबंध आहेत. मैत्रीपूर्व लढत होईल", असं उदयनराजे भोसले म्हणाले. "सर्वांच्या गाठीभेटी घेतल्या. मी आधीच सांगितलंय, सातारा लोकसभा मतदारसंघातून उभं राहणार म्हणजे राहणार. काय लाजायचं आणि काय लपवून ठेवायचं? उभं राहणार. जे काही असेल ते बघू", असं उदयनराजे भोसले म्हणाले."नेमकं काही नाही. मी आजपर्यंत कधी राजकारण केलेलं नाही. केलं तर संपूर्ण समाजकारण केलं. लोकहिताचं केलं. कधी कुणाच्या मध्ये बोललो नाही. कधी कुणाला दुखवलं नाही. लोकांचं प्रेम आहे. शेवटी लोकशाहीत लोकांचं प्रेम आहे. ते ठरवतील काय करायचं ते. मी इतक्यात जात नाही. जोपर्यंत ताकद आहे तोपर्यंत लोकांची सेवा करणार आहे. मग बघू सर्व", असं उदयनराजे म्हणाले.'शरद पवार वडीलधारी'"शरद पवार यांच्याबद्दल काय बोलणार? ते वडीलधारी आहेत. माझ्या बारशात जेवलेल्या लोकांबद्दल मी काय बोलू? काय बोलणार? मी सहज कासला गेलो होतो. घाटातल्या मंदिराची यात्रा होती. तिथे लोकं रजनिकांतच्या स्टाईलबद्दल बोलत होते.

# अँड.तात्यासाहेब घुमरे यांच्या जबरदस्त युक्तीवादामुळे एम पी डी ए कायद्याअंतर्गतील आरोपीची निर्दोष मुक्तता

**वादळवार्ता/पाटोदा**

पाटोदा (प्रतिनिधी) अंबाजोगाई येथील सटवा भागवत मेंडके यांच्यावर अपहरण करणे,खुणाचा प्रयत्न करणे,अवैद्य दारूभट्टया निर्माण करून दारूची विक्री करणे,दरोडा टाकणे तसेच सुपारी घेणे अशा अनेक गुन्ह्यांसाठी एम पी डी ए कायद्याअंतर्गत प्रशासनाकडून कारवाई करण्यात आली होती यामुळे सदरिल इसम भागवत मेंडके यांच्या नातेवाईकांनी औरंगाबाद हायकोर्टाचे विधीज्ञ अँड.तात्यासाहेब घुमरे यांच्याकडे ह्या प्रकरणाची केस देण्यात आली न्यायालयात सरकारी वकील व अँड तात्यासाहेब घुमरे यांच्यामध्ये जबरदस्त युक्तिवाद झाला यामध्ये अँड तात्यासाहेब घुमरे यांच्या कायदेशीर युक्तिवादाला यश आले व भागवत मेंडके यांचे स्थानबद्धता उच्च न्यायालय छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने रद्द करून निर्दोष मुक्तता केली यावेळी पत्रकारशी बोलताना अँड.



तात्यासाहेब घुमरे (पवार) म्हणाले की, जिल्ह्यातील अट्टल गुन्हेगारांवर वचक बसण्यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर, जिल्हाधिकारी दिपा मुंडे मुधोळ,यांनी अंबाजोगाई येथील अट्टल गुन्हेगार असलेला सटवा भागवत मेंडके याची एम पी डी ए कायद्याअंतर्गत एक वर्षाकरिता हरसुल कारागृह छत्रपती संभाजी नगर येथे स्थानबद्धतेचा आदेश पारित केला होता.या आदेशाला उच्च न्यायालय खंडपीठाचे विधीज्ञ एडवोकेट तात्यासाहेब घुमरे (पवार) यांच्यामार्फत स्थानबद्ध इसमाच्या नातेवाईकांनी स्थान बद्धतेच्या आदेशाला आव्हान दिले होते. स्थानबद्ध इसम सटवा भागवत मेंडके यांच्यावर अपहरण करणे, खुणाचा प्रयत्न करणे, अवैद्य दारूभट्टया निर्माण करून दारूची विक्री करणे, दरोडा टाकणे तसेच सुपारी घेणे अशा अनेक गुन्ह्यांसाठी जिल्हा पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर, जिल्हाधिकारी दिपा मुधोळ मुंडे, अंबाजोगाई अप्पर पोलीस अधीक्षक कविता नेरकर, LCP PI यांनी सटवा भागवत मेंडके या इसमाची स्थानबद्धता बीड जिल्ह्यासह इतर जिल्ह्यांमध्ये दहशत असल्यामुळे व कोणी तक्रार देण्यास धजावत नसल्यामुळे गंभीर दखल घेत एमपीडीए कायद्याअंतर्गत हरसुल कारागृह छत्रपती संभाजी नगर येथे केली होती.सदरील प्रकरणाची सुनावणी न्यायमूर्ती मंगेश पाटील व न्यायमूर्ती शैलेश ब्रम्हे यांच्या न्यायपिठासमोर झाली. युक्तीवादामध्ये घेतलेल्या अनेक मुद्द्यांच्या आधारे स्थानबद्ध इसम सटवा भागवत मेंडके यांचा एम पी डी ए कायद्याअंतर्गत दिलेला स्थानबद्धतेचा आदेश रद्द करून सटवा भागवत मेंडके याची निर्दोष मुक्तता केली.

# ओबीसी संकटात असतांना ताईसाहेब कुठं होत्या? बीड लोकसभेसाठी सक्षम उमेदवार देणार-प्रा.टी.पी.मुंडे




**वादळवार्ता/परळी**

ओबीसी संकटात असतांना, ओबीसी आरक्षणाला धक्का लागत असतांना स्वतंला ओबीसी नेत्या म्हणवून घेणाऱ्या पंकजाताई मुंडे तेंव्हा कुठे होत्या असा सवाल ओबीसी बहुजन पार्टीचे राष्ट्रीय उपाध्यक्ष प्राध्यापक टी .पी.मुंडे यांनी केला .बीड लोकसभा २०२४ निवडणुकीसाठी ओबीसीचा सक्षम उमेदवार देणार असल्याचे यावेळी प्रा .टी .पी .मुंडे यांनी जाहीर केले .ते परळी येथील औद्योगिक वसाहतीत ओबीसी मेळाव्यात मार्गदर्शन करताना बोलत होते.

यावेळी पुढे बोलताना प्रा .टी. पी.मुंडे म्हणाले की ,महाराष्ट्रामध्ये ओबीसी समाजाची प्रचंड ताकद आहे .भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून ओबीसीला आरक्षण दिले .त्यामुळे त्यांचा विकास होत आहे .परंतु ओबीसींचे आरक्षण धोक्यात आले तर ओबीसीचा विकास खुंटला जाईल. ओबीसी समाजाच्या मुलाबाळांच्या शिक्षण आणि नोकऱ्याचा गंभीर प्रश्न निर्माण होणार आहे.

महाराष्ट्रात ओबीसी समाजाचे २१ मेळावे घेण्यात आले.प्रत्येक मेळाव्यात लाखोंचा जनसमुदाय उपस्थित होता. तेंव्हा सगळ्यांचेच मत निघाले की ओबीसींचा स्वतंत्र पक्ष असावा म्हणून ओबीसींचे नेते प्रकाश अण्णा शेंडगे व आम्ही सर्वांनी मिळून ओबीसी बहुजन पार्टीची स्थापना केली. सरकारने आमच्या ताटातला घास काढून घेण्याचा प्रयत्न केला.त्यांना ओबीसी समाज धडा शिकविल्या शिवाय राहणार नाही.

यांप्रसंगी प्रा. टी.पी.मुंडे यांनी बीड लोकसभा मतदारसंघासाठी कुणाला उभे करायचे की मी उभा राहू याविषयी उपस्थितांची मते जाणून घेतली.येत्या चार दिवसांत बीड लोकसभा मतदारसंघासाठी ओबीसी बहुजन पार्टीचा उमेदवार जाहीर करु असेही प्रा.टी.पी.मुंडे म्हणाले. या मेळाव्यास प्रचंड गर्दी होती.यावेळी मराठवाडा विभागातील पदाधिकारी यांना प्रा.टी.पी.मुंडे यांनी नियुक्ती पत्र दिले. यावेळी भीमराव मुंडे यांची ओबीसी बहुजन पार्टीच्या मराठवाडा अध्यक्ष म्हणून नियुक्तीपत्र देण्यात आले तसेच विनायक गडदे यांना बीड जिल्हाध्यक्ष सूर्यकांत मुंडे यांना तालुकाध्यक्ष आणि माणिकराव सलगर यांना तालुका उपाध्यक्ष पदी निवड केली.

यावेळी भीमराव मुंडे, रिपाईचे दशरथ शिंदे, प्रभाकर अण्णा फड,संतराम गडदे, माणिकराव सलगर, भागवत सलगर, विनायक गडदे, सूर्यकांत मुंडे,आप्पाराव पांढरे महाराज, ओम प्रकाश सारडा, अनिल मस्के अशोकराव नागरगोजे, इंद्रोबा दहिफळे, छत्रपती कावळे, मीराताई जगताप, नूरबानोखाला आदीसह प्रमुख कार्यकर्ते, ओबीसी बांधव युवक कार्यकर्ते हजारोच्या संख्येने उपस्थित होते.

# स्वरूपाच्या शोधात राहतो तो साधक. /वे. राम महाराज डोंगर.

**दैनिक वादळ वार्ता**

काल्याच्या कीर्तनाने पैठण येथे शांतीब्रह्म एकनाथ महाराजांच्या समाधी सोहळ्याची सांगता बीड प्रतिनिधी : मानवी जीवनात माणसे सुखाच्या शोधात राहतात पण ज्यातून दुःख ,तृष्णा मिळेल हेच कर्म केले जाते. खरे सुख कशात आहे हे शोधत नाहीत. आपले स्वरूप शोधले तर त्यात परम कल्याण आहे. स्वरूप म्हणजे आनंद, अद्वैत आहे. हेच मानवी जीवनाचे ध्येय आहे व त्याच्या शोधातील माणसांना साधक म्हणतात. म्हणून स्वरूपाच्या शोधात राहतो तो साधक आहे असे प्रतिपादन वेदांताचार्य हरिभक्ति परायण राम महाराज डोंगर जाट नांदूर यांनी पैठण येथे काल्याच्या किर्तन प्रसंगी केले. श्रीक्षेत्र पैठण येथे गोदावरीच्या तटावर शांतिब्रह्म एकनाथ महाराज यांच्या 425 व्या जलसमाधी सोहळ्यानिमित्त बीड जिल्ह्यातील श्रीक्षेत्र ज्ञानेश्वर आश्रम दगडवाडी बीड जिल्हा यांच्या वार्षिक नियमाप्रमाणे



दिंडी सोहळ्यात दिंडी चालक हरिभक्ति परायण वैराग्यमूर्ती नारायण महाराज डिसले यांच्या आयोजनातून बहु बरा बहु बरा / या सांगाते मिळे चारा //१//या संत तुकाराम महाराज यांच्या काला प्रकरणातील अभंगातून वेदांताचार्य हरिभक्तिपरायण राम महाराज डोंगर हे भगवंताच्या स्वरूप लक्षणाविषयी सांगतात. आपल्या अभंग निरूपणातून बोलतांना हरिभक्ति परायण राम महाराज डोंगर म्हणाले की, आपले आराध्य दैवत भगवान परमात्मा पांडुरंग आहे. त्याच्या स्वरूप लक्षणाने परमात्मा हा व्यापक, नित्य, आनंदस्वरूप असा आहे .याच्या प्राप्तीसाठी साधकाने मी कोण आहे ? मी कुठून आलो ? माझे कर्तव्य काय आहे ? जगत काय ! कर्ता कोण ? हे कळावे. शास्त्र विचार करून आचरण केल्यास आपला विकास होईल.

# बहुजन समाज पार्टी बीड लोकसभा निवडणूक मोठ्या ताकदीने लढणार-डॉ. सिद्धार्थ टाकणखार

माजलगाव-बहुजन समाज पार्टी बीड जिल्ह्याच्या वतीने दिनांक 3/042024 बुधवार रोजी दुपारी एक वाजता संघर्ष भूमी, आंबेजोगाई जिल्हा बीड येथे बहुजन समाज पार्टीची महत्त्वपूर्ण बैठक संपन्न संपन्न झाली या बैठकीचे प्रमुख मार्गदर्शक बहुजन समाज पार्टीचे प्रदेश सचिव तथा मराठवाडा झोन प्रभारी डॉक्टर सिद्धार्थ टाकणखार यांनी यावेळी आपले विचार व्यक्त केले या प्रसंगी आपले विचार मांडताना त्यांनी बहुजन समाज पार्टी ही कोण्या एका जातीची पार्टी नसून ती एससी ,एसटी ,ओबीसी आणि धार्मिक अल्पसंख्याक समाजाची पार्टी आहे .आज घडीला नंबर तीन ची राष्ट्रीय पार्टी असून समग्र देशांमध्ये बहन कुमारी मायावती जी यांच्या नेतृत्वाखाली पक्ष स्वबळावर लोकसभेची निवडणूक लढवत आहे होऊ घातलेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये पक्ष सोशल इंजिनिअरिंग चा फॉर्मुला वापरून बहुसंख्य मुस्लिम उमेदवार ,ओबीसी उमेदवार, दलित उमेदवार तसेच आदिवासी उमेदवार , ब्राह्मण उमेदवारांना उमेदवारी देऊन तिसरी शक्ती म्हणून उदयास येणार आहे अशी रणनीती बहन कुमारी मायावती जी यांनी तयार केली आहे. याचाच भाग म्हणून बीड लोकसभेतील जातीय समीकरणाचा विचार करून जिसकी जितनी संख्या भारी उसकी उतनी हिसे दारी या तत्त्वाचा अवलंब करून बहुजन समाज पार्टी बीड लोकसभा निवडणूक स्वबळावरती मोठ्या ताकदीने लढणार आहे असे मत डॉक्टर सिद्धार्थ टाकणखार यांनी व्यक्त केले आहे सदरील बैठकीसाठी बीड जिल्हा सचिव स .का. पाटेकर ,जिल्हा कार्यकारणी सदस्य एडवोकेट डी .एल.उजगरे विधानसभेचे प्रभारी संजय हराळ माजलगाव विधानसभेचे प्रभारी रामेश्वर बडे माजलगाव विधानसभा अध्यक्ष अरविंद लोंढे परळी विधानसभेचे प्रभारी सोनवणे ,परळी विधानसभेचे अध्यक्ष एडवोकेट बुद्ध रत्न उजगरे ,केज विधानसभेचे अध्यक्ष प्राध्यापक राहुल सुरवसे इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते तसेच या महत्त्वपूर्ण बैठकीचे सूत्रसंचालन प्राध्यापक सुनील कांबळे यांनी केले तर प्रस्ताविक भीमराव शिरसाट यांनी व्यक्त केले तसेच उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे आभार हरिभाऊ साळवे यांनी मानले. या बैठकी करिता अभिमान न्यू साळवे बाबासाहेब लांडगे उमाकांत खोपे भीमराव शिरसाट कैलास साळवे मारुती जोगदंड चंद्रकांत शेलुकर सत्यवान वावळे अमोल ठोके आनंद कांबळे , दादासाहेब कोल्हे प्रभाकर मिसाळ प्रमोद मुळे रजनीकांत वाघमारे कुमार फुलवरे, तसेच जिल्ह्यातील इत्यादी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चूक आधार कार्ड बनवून देणाऱ्या यंत्रणांची भोगावे लागते नागरिक व वयोवृद्धांना !

**दैनिक वादळ वार्ता**
**अंबाजोगाई/परवेज पटेल**

अंबाजोगाई बीड आधार कार्ड बनवून देणारी यंत्रणा आता खाजगी लोकांच्या हातात देण्यात आली आहे. विशेष म्हणजे या खाजगी यंत्रणांनी आधार कार्ड बनविण्यासाठी नियुक्त केलेल्या माणसांना याचे गांभीर्यच नाही. म्हणून आधार कार्ड बनवण्यासाठी त्यांच्याकडे गेलेले लोक त्यांना माहिती सांगतात एक आणि ते दुसरंच काहीतरी टाकून देतात. यामुळे अनेकांच्या नावात तफावत चुकीचे वय व पत्ते, भ्रमणध्वनी क्रमांक चुकीचे असा सगळा गोंधळ या खाजगी यंत्रणांकडून आधार कार्ड बनविताना घातला जात आहे. थोडक्यात चूक या खाजगी यंत्रणांची असून त्यांनी केलेल्या चुकांचा त्रास मात्र आधार कार्ड धारकांना सहन करावा - लागत आहे. त्यातही आधार कार्ड धारक वयोवृद्ध असतील तर त्यांच्या त्रासात जास्तच भर पडत आहे. याकडे शासकीय प्रशासकीय यंत्रणांनी विशेष लक्ष देऊन आधार कार्ड बनवून देणाऱ्या यंत्रणांना टाईट करणे गरजेचे झाले आहे. विविध शासकीय योजनांच्या लाभाकरिता आधार कार्ड अपडेट करावे लागते. यासाठी जन्माचा पुरावा म्हणून जन्माचा दाखला अनिवार्य आहे मात्र बहुतांश वृद्धांकडे जन्माचा दाखला नसल्याने वृद्धांचे आधार कार्ड अपडेट करणे वृद्धांना डोकेदुखी ठरत आहे तर अनेकांची जन्माची नोंदच नसल्याने वृद्धांच्या अडचणीत वाढ झाली आहे. ही परिस्थिती पाहता वृद्धांचा शाळा सोडल्याचा दाखला ग्राह्य धरण्यात यावा. कारण वृद्धापकाळात जन्म दाखला कुठून आणावा असा प्रश्न ज्येष्ठ नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. काही काळापूर्वी महिलांची प्रसूती घरीच होत असल्याने त्यावेळेस जन्माच्या नोंदीला फार महत्त्वही नव्हते. यामुळे - अनेक ज्येष्ठ नागरिकांकडे जन्माच्या नोंदी किंवा प्रमाणपत्र नाही मात्र आता सगळीकडे आवश्यक असलेल्या आधार कार्ड ला अपडेट करण्यासाठी जन्म प्रमाणपत्र असणे आवश्यक करण्यात आले आहे. आधार कार्ड हा महत्त्वाचा पुरावा मानला जातो. विविध शासकीय योजनांसोबतच इतरही अनेक कामाकरिता - आधार कार्ड गरजेचे मानले जात आहे. आधार कार्ड शिवाय शासकीय योजनेत - कोणतेच काम होत नाही. अशातच ग्रामीण भागात आधार कार्ड बनवताना बऱ्याच त्रुटी ठेवण्यात आल्याचे आढळते. म्हणून आधार कार्ड बनविताना संबंधित यंत्रणेने केलेल्या चुकांचा त्रास मात्र आधार कार्ड धारकांना होऊ लागला आहे. करे कोई भरे कोई प्रमाणे यंत्रणेने केलेल्या चुकांचा त्रास मात्र आधार कार्ड = धारकांना सोसावा लागत आहे. शिवाय आधार कार्ड अपडेट करताना जास्त वय झालेल्या वयोवृद्धांच्या बोटांचे ठसे उमटत नसल्याने या त्रासात अजून जास्तच वाढ झाली आहे. हे पाहता वयोवृद्ध झालेल्या नागरिकांचा शाळा सोडल्याचा दाखला ग्राह्य धरण्यात यावा. अनेक वृद्धांच्या बोटाचे ठसे उमटत नसल्याने आधार कार्ड अपडेट होत नाही. यामुळे अनेक शासकीय योजनांपासून वयोवृद्ध नागरिकांना वंचित राहण्याची वेळ येत आहे. यामुळे वृद्धापकाळात जन्म दाखला - कुठून आणावा असा प्रश्न ज्येष्ठ नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे

# खोपोली च्या के एम सी महाविद्यालयाच्या जिव्हाळा ग्रुपचे स्नेह संमेलन उत्साहात संपन्न

खोपोली-(प्रतिनिधी

के. टी. एस. पी. मंडळाचे के. एम. सी. महाविद्यालय तृतीय वर्ष कला शाखा सन १९८४-८५ या वर्षी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे नुकतेच स्नेहसंमेलन अतिशय उत्साहात पार पडले. अडतीस वर्षानंतर महाविद्यालयात एकत्र आल्याने विद्यार्थ्यांच्या आनंदाला पारावार उरला नव्हता.

सकाळपासून सर्व वर्गमित्र, मैत्रीणी , वेगवेगळया ठिकाणाहून वर्गमित्र आले होते. या स्नेहसंमेलना करिता प्राचार्य युवराज महाजन , विद्यमान प्राचार्य - प्रताप पाटील , उपाध्यक्ष - दिलीप पोरवाल , उपप्राचार्य - आण्णासाहेब साहेब कोरे , कार्यालय अधीक्षक- सौ.गीता नाईक , लॅब असिस्टंट- बाळकृष्ण कालेकर ( महाराज) आदी मान्यवर मंडळी आवर्जून उपस्थित होती. सुरुवातीला सर्वांनी एकत्र आल्यानंतर चहा, नाष्टा करून कॉलेजच्या इमारतींना भेटी दिल्या. नंतर हास्य -विनोद करत गीत गात, तर अनेकांनी आयुष्यातील अनुभव कथन करत सर्वांनी एकत्र येऊन स्नेहभोजनाचा आनंद घेतला.

जिव्हाळा ग्रुपची आठवण रहावी म्हणून एक वडाचे झाड लावण्यात आले महाविद्यालयाला भेटवस्तू देऊन दिवसभर उत्साही वातावरणात आनंद देणारा हा सोहळा न भूतो न भविष्यती अशा प्रकारे आनंदाची शिदोरी बांधून संपन्न झाला. के एम सी महाविद्यालयाचे प्राचार्य एस एस भोसले सर यांच्या आठवणीने अनेकदा सभागृह भावनिक झाले.

# शेतकरी व कामगाराचा उत्कर्ष हेच जय महेशचें ध्येय -जी आर चिंताला

**दैनिक वादळ वार्ता**
**माजलगाव :**

शेतकरी, ऊसतोडणी मंजूर व कामगार यांचा आर्थिक उत्कर्ष होऊन राहणीमान व सामाजिक स्तर उंचावला पाहिजे. एन एस एल शुगर्स ग्रुपचे प्रथमपासून हेच ध्येय असल्याचे प्रतिपादन एन एस एल शुगर्स ग्रुपचे चेअरमन जी आर चिंताला यांनी एन एस एल ग्रुप च्या "जय महेश" शुगर्सच्या 2023-24गळीत हंगाम समाप्तीच्या शानदार कार्यक्रमात मंगळवार 3 एप्रिल रोजी केले.

यावेळी व्यासपीठावर एन एस एल ग्रुप चें टेकनिकल उपाध्यक्ष आरलप्पन्न, एनएस एल ग्रुप चें मेकॅनिकल उपाध्यक्ष राजशेखर, डॉ आर जी बजाज, डॉ सुरेंद्र कंलंत्री, जय महेश चें युनिट हेड एम पी पुरुषोत्तम, मेकॅनिकल हेड सचिन देशमुख, प्रोसेस हेड राजीव एन एम, शेतकी अधिकारी सुजय पवार, डिस्टंलरी हेड नारायण मोटराव, इलेक्ट्रिकलं हेड संतोह राजू, इन्स्ट्रुमेंट हेड संजय भाटिया, डब्लू टी पी इन्चार्ज सुखदेव येलापुरे, एच आर मॅनेजर देवप्पा जोगदे, अकाउंट हेड महेंद्र बाविस्वाले, पर्चेस हेड वैद्यनाथन, को-जन हेड नागराज बिरादार उपस्थित होते.

2023-24 या वर्षात 9,12,852 टन ऊस गाळप करण्यात आल्यानंतर मंगळवारी तालुक्यातील एन एस एल ग्रुप च्या जय महेश शुगर्स ने यंदाच्या गळीत हंगामाची सांगता अतिशय शानदार पद्धतीने करत 19 विभागातील प्रत्येक विभागातून सर्वाधिक ऊस देणाऱ्या शेतकऱ्यांना प्रथम द्वितीय व तृतीय, तसेच एकरी सर्वाधिक ऊस उत्पादन घेणाऱ्या 3शेतकऱ्याचे तसेच तोडणी वाहतूक करणाऱ्या टोळ्याची चार वर्गात विभागणी करून प्रत्येकी 3 ठेकेदारचा रक्कम,सन्मानचिन्ह देऊन भव्य असा सन्मान प्रथमच युनिट हेड पुरुषोत्तम एम पी यांच्या कल्पनेतून करण्यात आला. अतिशय चांगला उपक्रम घेऊन शेतकऱ्यांना भविष्यात आढिक जोमाने शेती करण्यात यावी यासाठी हा प्रेरणादायी कार्यक्रम घेण्यात आल्याची प्रतिक्रिया शेतकऱ्यांनी दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दत्तात्रय आहेरकर . तर प्रस्ताविक युनिट हेड पुरुषोत्तम एम पी यांनी केले.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भगवान थावरे, भास्कर फपाळ, बंडू सोळंके, गोपाल मानधने, भगवान राठोड,बी जी पवार,दत्ता रोडे कामगार युनियन चे सर्व पदाधिकारी व कामगार यांनी प्रयत्न केले.

शेतकऱ्यांना प्रथमच हजारोची बक्षीस

जय महेश ने 19 विभागतील सर्वाधिक ऊस देणाऱ्या शेतकऱ्यांना हजारो रु ची बक्षीस दिली.प्रत्येक विभागातून प्रथम बक्षीस 5000, द्वितीय बक्षीस 4000 रु, तृतीय बक्षीस 3000 रु दिले तसेच एकरी सर्वात जास्त ऊस उत्पादन करणाऱ्या 3 शेतकऱ्यांना याच प्रकारे बक्षीस दिले. तर तोडणी वाहतूक मध्ये ट्रकटर गट, हार्वेस्टर गट, मिनी ट्रकटर गट व बैलगाडी प्रत्येक गटातून तीन बक्षीस यांचप्रकारे देण्यात आले या मुळे शेतकऱ्या सोबत कामगारांनी जय महेश ला धन्यवाद दिले जयमहेश ने प्रथमच अतिशय चांगला उपक्रम घेऊन शेतकऱ्यांना भविष्यात आधीक जोमाने शेती करण्यसाठी हा प्रेरणादायी कार्यक्रम घेण्यात आल्याची प्रतिक्रिया बबन थावरा पवार मोगरा या शेतकऱ्यांने दिली.महाराष्ट्रात आजपर्यंत कोणत्याच कारखान्याने असा उपक्रम राबवला नसेल असे सुरेश रंगनाथ तिडके दिंदरुड येथील शेतकरी म्हणाले.

दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव दैनिक
# वादळ वार्ता

## वेदांत जाधव ची नवोदय विदयालय साठी निवड

माजलगाव (प्रतिनिधी): जवाहर नवोदय विद्यालय प्रवेशासाठी जानेवारी २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षांचा निकाल नुकताच जाहीर झाला असून माजलगाव तालुक्यातील सुरुमगाव येथील वेदांत दत्तात्रय जाधव या विद्यार्थ्याने घवघवीत यश संपादन केले असून तो नवोदय विद्यालय गढी येथील प्रवेशा साठी पात्र ठरला आहे. त्याच्या या यशाबद्दल शिवाज्ञ नवोदय क्लासेस माजलगाव चे शिक्षक विद्यार्थी वर्ग , गणेश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय हिवरा चे मुख्याध्यापक , शिक्षक , कर्मचारी , विद्यार्थी वर्ग सह सुरुमगाव येथील ग्रामस्थ व सर्व नातेवाईक यांनी त्याचे अभिनंदन केले आहे.



# अॅड. प्रकाश आंबेडकरांचा अर्ज दाखल, अकोल्यात वंचितचे जोरदार शक्तिप्रदर्शन

**वादळवार्ता /अकोला**

अकोला लोकसभा मतदारसंघात दुसऱ्या टप्प्यात २६ एप्रिलला मतदान होणार आहे.
या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज
दाखल करण्याची ४ एप्रिल ही शेवटची मुदत होती. अकोला लोकसभा मतदारसंघात वंचित बहुजन आघाडीच्यावतीने अॅड. प्रकाश आंबेडकर यांनी गुरुवारी अर्ज दाखल केला. पक्ष कार्यालयापासून ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत काढलेल्या फेरीमध्ये वंचित आघाडीने जोरदार शक्तिप्रदर्शन केले. या फेरीमध्ये मोठ्या संख्येने गर्दी उसळली होती. अकोला लोकसभा मतदारसंघात दुसऱ्या टप्प्यात २६ एप्रिलला मतदान होणार आहे. या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची ४ एप्रिल ही शेवटची मुदत होती. आज अॅड. प्रकाश आंबेडकर यांनी शक्तिप्रदर्शन करून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. शहरातील टॉवर चौक येथील कार्यालयातून फेरीला सुरुवात झाली. याठिकाणी सकाळपासूनच मोठी गर्दी जमा झाली होती. टॉवर चौक, फतेह चौक, खुले नाट्यगृह, पंचायत समिती मार्गे ही फेरी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर दाखल झाली. तापत्या उन्हामध्ये अॅड. प्रकाश आंबेडकर, प्रा. अंजली आंबेडकर यांच्यासह पक्षाचे प्रमुख पदाधिकारी फेरीमध्ये पायदळ सहभागी झाले होते. अॅड. प्रकाश आंबेडकर यांचे ठिकठिकाणी उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर त्यांनी फेरीला संबोधित केले. यावेळी मोठा जनसमुदाय उपस्थित होता. दुपारी अॅड. आंबेडकर यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.



## ग्राहक पंचायत राधानगरी तालुका अध्यक्षपदी संजय पारकर तर सचिव पदी दिनकर पाटील

**दैनिक वादळ वार्ता**
**कुडूत्री/सुहास चौगुले**

ग्राहक पंचायत महाराष्ट्र च्या राधानगरी तालुका अध्यक्षपदी सोन्याची शिरोली येथील सामाजिक कार्यकर्ते व ज्येष्ठ पत्रकार संजय शंकर पारकर यांची तर सचिव पदी दिनकर दत्तात्रय पाटील यांची निवड करण्यात आली. उपाध्यक्षपदी मारुती शामराव पाटील व संघटक पदी उमेश गणपतराव गायकवाड यांची निवड झाली. अन्य कार्यकारणी याप्रमाणे





सहसंघटक कुंडलिक बळवंत पाटील, महिला संघटिका वेला वैभव किल्ले, कोषाध्यक्ष दिनकर गणपती चौगुले, सदस्य प्रसाद शंकर हुपरीकर, सर्जेराव भीवा चौगुले, मारुती आनंदा पाटील, दत्तात्रय सखाराम वर्णने, राजाराम रामचंद्र पाटील, पांडुरंग कृष्णाजी येरुडकर, राजश्री प्रवीण कोरगावकर.

ग्राहक पंचायत चे राज्य अध्यक्ष डॉक्टर विजय लाड यांच्या मान्यतेनुसार जिल्हाध्यक्ष बि. जे. पाटील जिल्हा संघटक सुरेश माने, उपाध्यक्ष सतीश फणसे महिला संघटिका पुनम देसाई यांनी ही कार्यकारणी जाहीर केली.

## महाविकास आघाडीची आढावा बैठक लोकसभा निवडणूक नियोजनासाठी जिल्ह्यातील मित्र पक्ष एकत्र

**वादळवार्ता/बीड**

लोकसभा निवडणुकीची तयारी करण्यासाठी इंडिया आघाडीतील मित्र पक्षांची सोमवार (दि.१) रोजी शहरातील राष्ट्रवादी भवन येथे बैठक पार पडली. यावेळी देतील तो उमेदवार मोठ्या फरकाने विजयी करण्याचा निर्धार सर्वपक्षीय प्रतिनिधी व कार्यकर्त्यांनी केला.

लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सध्या सुरू झाली आहे. बीड लोकसभा मतदारसंघाची जागा महाविकास आघाडीकडून राष्ट्रवादी-कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची असणार आहे. अद्यापपर्यंत उमेदवार जाहीर झाला नसला तरी येत्या काही दिवसांतच उमेदवार जाहीर करण्यात येणार असल्याचे पक्षाकडून सांगण्यात येत आहे. या अनुषंगाने सोमवारी (दि.१) रोजी राष्ट्रवादी भवन येथे महाविकास आघाडीचे जिल्ह्यातील सर्व घटक पक्ष व मित्र यांची आढावा बैठक झाली. या बैठकीत बूथ समितीची कामे आदीचा आढावा घेतला. तसेच पुढील नियोजनाबाबत चर्चा करण्यात आली. या बैठकीस महाविकास आघाडीतील पक्षांचे जिल्हाध्यक्ष, जिल्हाप्रमुख, तालुकाध्यक्ष, तालुकाप्रमुख तसेच सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## दासखेड येते जुगाराच्या अड्ड्यावर पाटोदा पोलीसांचा छापा

**वादळवार्ता/पाटोदा**

पाटोदा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अनमोल केदार यांनी दिनांक ३-४-२०२४ रोजी गोपनीय माहिती मिळाल्याने अनमोल केदार यांनी आपल्या अधिपत्या खालील पीएसआय गाडे, काटकर, एएसआय वाघ, एचसी जायभाय, काकडे, पीसी कोळेकर, पठाण स्टाफ यांना सदरची माहिती कळवून पंचासह कारवाई करण्याकरिता तात्काळ घटनास्थळी रवाना करून पाटोदा तालुक्यातील दासखेड येथे नदीच्या बाजूला असलेल्या झाडाखाली जुगाराचा खेळ चालू असताना पाटोदा पोलीस स्टेशन स्टाफने अचानकपणे छापा मारला असता काही इसम चाहूल लागल्यामुळे मोकळ्या रानात पळु लागले असता त्यांचा पाटोदा पोलिसांनी पाठलाग करून पकडले सदरच्या ठिकाणी एकूण १२ आरोपी जुगार खेळ पैशावर खेळत असताना मिळून आले सदरच्या कारवाईमध्ये १) पांडुरंग संदीपान कोकाटे वय ५१ वर्ष २) साहेबराव किसन कोकाटे वय ५५ वर्ष ३) अनिल सिताराम



कोकाटे वय ६० वर्ष ४) लक्ष्मण भगवानराव मोरे वय ३८ वर्ष ५) दत्तात्रय बन्सीधर कोकाटे वय ४४ वर्ष ६) सुभाष शांतीलाल वाघीरे वय ५६ वर्ष ७) दत्तात्रय बापुराव कोकाटे वय ४८ वर्ष ८) हरीभाऊ भिमराव कोकाटे वय ५२ वर्ष ९) प्रशांत आणासाहेब कोकाटे वय ४४ वर्ष १०) गणेश मारोती कोकाटे वय ४५ वर्ष ११) रमेश काकासाहेब कोकाटे वय ३१ वर्ष सर्व रा. दासखेड ता. पाटोदा १२) अनिल विठ्ठल बाबर रा. हिंगणी ता. करमाळा जि. सोलापुर यांना ताब्यात घेतले असून बेकायदेशीर रित्या पत्यावर पैसे लावुन स्वतःच्या फायदयासाठी तिर्रट नावाचा जुगार खेळत व खेळवित असताना जुगाराचे साहीत्य, रोख ११२४० रुपये व जुगार खेळण्यासाठी येणे जाणे साठी वापरलेल्या चार मोटार सायकल किमत १९५००० रुपये असा एकुण २०६२४० रुपये सह मुद्देमालासह जप्तीची कारवाई करून सदर आरोपीतांविरुद्ध कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार कायदा प्रमाणे पोलीस उपनिरीक्षक माधव नारायण काटकर यांच्या फिर्यादीवरून पोलीस स्टेशन पाटोदा येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर, मा.अप्पर पोलीस अधीक्षक पांडकर साहेब. मा.उपविभागीय पोलीस अधिकारी अभिजीत धाराशिवकर,यांच्या मार्गदर्शनाखाली पाटोदा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अनमोल केदार,पोलीस उपनिरीक्षक भागवत गाडे,पोलीस उपनिरीक्षक माधव काटकर, सहाय्यक फौजदार बाळासाहेब वाघ,पोलीस हवालदार सुनील जायभाय, पोलीस हवालदार संतोष काकडे,पोलिस अंमलदार सचिन कोळेकर व रियाज पठाण यांनी केली असल्यामुळे पाटोदा पोलिसांच्या धडाकेबाज कारवाईमुळे दोन नंबर क्षेत्रातील लोकांच्या मनात धडकी भरली आहे

# जिल्ह्यातील अनाधिकृत शस्त्र जप्त करा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचे आदेश

## आदेश पालन न करणाऱ्यांवर सक्त कारवाईचे

**वादळवार्ता/बीड**

सार्वत्रिक लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर आदर्श आचारसंहिता लागू झाली असून चौथ्या टप्प्यात १३ मे रोजी ३९ बीड मतदार संघात मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील सहा विधानसभा मतदार संघात कुणाकडे अनाधिकृत शस्त्र असल्यास ते जप्त करण्याचे सक्त आदेश जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी आज झालेल्या कायदा व सुव्यवस्थेच्या बैठकीत पोलीस अधिकाऱ्यांना दिले. जिल्हा नियोजन सभागृहात आज सार्वत्रिक लोकसभा निवडणूक २०२४ ची कायदा व सुव्यवस्थेची आढावा बैठक घेण्यात आली. त्यावेळी जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी बोलत होत्या. यावेळी जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी, पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर, अपर जिल्हाअधिकारी डॉ. त्रिगुण कुलकर्णी, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अंबाजोगाई चेतना तिडके, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्र कुमार कांबळे, सर्व जिल्ह्याचे सहाय्यक निर्णय निवडणूक अधिकारी यांच्यासह अन्य पोलीस अधिकारी यावेळी उपस्थित होते.

बीड जिल्ह्यातील काही तालुक्यांमध्ये अनाधिकृत शस्त्र मोठ्या प्रमाणात आहेत. अनधिकृत शस्त्र जमा



न करणाऱ्यांवर पोलिसांनी कायदेशीर कारवाई करून असे शस्त्र जप्त करावेत. अनाधिकृत शस्त्र जप्तीबाबतची आढावा बैठक पुढील आठवड्यात घेण्यात येणार असल्याचे जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी सांगितले. यावेळी जिल्हा निर्णय निवडणूक अधिकारी यांनी कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याच्या सीमेवरचा नाकेबंदीचा पॉईंट दुसऱ्या जिल्ह्याच्या सीमेलगत असावा असे सुचविले. यामुळे दोन्ही जिल्ह्यातून अवैध होणारी वाहतूक अथवा अन्य कायदा सुव्यवस्था बिघडणाऱ्या गोष्टीवर नियंत्रण ठेवण्यात येईल. जर दोन जिल्ह्यातील अंतर अधिक असेल अशावेळी अधिकचा बंदोबस्त लावण्यात यावा असे यावेळी निर्देशित केले. जिल्ह्यात १४ ठिकाणी नाकेबंदी करण्यात आली असून या ठिकाणी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी पोलिसांना मूलभूत सुविधा प्रदान कराव्यात अशा सूचना यावेळी जिल्हा दंडाधिकारी यांनी केल्या. न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे जिल्ह्यातील कोणत्याही गावाला गावबंदी करता येणार नाही तसे कुठलेही बोर्ड लावता येणार नाही तसे बोर्ड असल्यास ते काढून घ्यावे, आणि न्यायालयाची अवहेलना केली असल्यास कायदेशीर कारवाई करावी असेही जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी निर्देशित केले. एखाद्या घटनेची संभाव्य माहिती मिळत असल्यास ती होण्यापूर्वीच योग्य ती कारवाई पोलिसांकडून करण्यात यावी, अशी सूचनाही त्यांच्याकडून करण्यात आली.

जे पोलीस अधिकारी तसेच कर्मचारी निवडणुकीच्या कामावर आहेत त्यांच्यासाठी पोस्टल मतदानाचा उपयोग करन्यात आलेला आहे. यासाठी सहाय्यक निर्णय निवडणूक अधिकाऱ्यांनी याबाबत भारतीय निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे सुविधा केंद्र तयार करून पोस्टल मतदानासाठी ग्राह्य असलेल्या मतदारांचे मतदान करून घ्यावे, अशा सूचना यावेळी जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी यावेळी केल्या.

दैनिक वादळ वार्ता हे पत्र मुद्रक ग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथून डिजिटल छापून संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथून त्यांच्या ऑफिस वरून बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )